मुंबई, दि. २५/०२/२०१६

जैन इरीगेशनचे भंवरलाल जैन यांचे निधन

# शेतीला वरदान ठरलेल्या ‘ठिबक सिंचन यंत्रणेचा’ शेतकरी प्रिय निर्माता गमावला

**- कृषीमंत्री एकनाथराव खडसे**

मुंबई, दि. २५ फेब्रुवारी : पाण्याचा काटकसरीने वापर करुन कमी पाण्यात अधिक कृषी उत्पन्न घेता यावे यासाठी ठिबक सिंचन पध्दत निर्माण करुन ती शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय करणारा उद्योजक भंवरलाल जैन यांच्या दु:खद निधनामुळे आपण गमावला आहे, अशा शब्दात राज्याचे कृषीमंत्री एकनाथराव खडसे यांनी भंवरलाल जैन यांच्या निधनाबद्दल आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

आपल्या शोक संदेशात मंत्री खडसे यांनी म्हटले आहे की, भंवरलाल जैन यांच्या निधनामुळे मी माझ्या जवळच्या स्नेहयाला कायमचा अंतरलो आहे. अविरत कष्ट, शेतीचा आधुनिक तंत्रज्ञानाने विकास करण्याचा सतत ध्यास, नवनवीन कृषी तंत्राचा शोध व त्याची व्यावहारिक दृष्टया अंमलबजावणी यासाठी त्यांनी आपली सारी हयात खर्च केली. अगदी किरकोळ व्यवसायापासून आपली कारकीर्द सुरु केलेल्या भंवरलाल जैन यांनी दीर्घ कालीन नियोजन बध्द रित्या आपला व्यवसाय विविध अंगाने महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभर वाढविला. प्लास्टीक पाईप व कृषी साधनांच्या निर्मितीचे २९ प्लँन्टस् , मायक्रो इरिगेशन सिस्टीम, प्लास्टीक पाईप्स व जोडसाधने, कृषी प्रक्रिया साधने, नविनीकरणयोग्य ऊर्जा साधने, टिश्यु कल्चर इ. शेतीशी संबंधित अनेक क्षेत्रामध्ये ‘पाण्याच्या प्रत्येक थेंबापासून अधिक कृषी उत्पादन’ हे ध्येय बाळगून त्यांनी दूरदृष्टी आणि कर्तृत्वाच्या बळावर यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. भारत सरकारने त्यांच्या व्यापक कार्याची दखल घेवून त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते.

भंवरलाल जैन यांच्या निधनामुळे ठिबक सिंचन क्षेत्राचा मोठा आधारस्तंभ निखळला आहे. मी शोकाकूल अशा जैन परिवाराच्या दु:खात सहभागी आहे. या परिवारातील सर्व सदस्यांना भंवरलाल जैन यांच्या निधनाचे दु:ख सहन करण्याची त्यांना देवो, हीच ईशचरणी प्रार्थना.

---------